N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस स्टेशन, गाडगे नगर अमरावती (शहर)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अमरावती शहर **P.S.(ठाणे):** गाडगे नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0113 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 31/01/2024 19:15

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 31/01/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 31/01/2024
**Time From (वेळेपासून):** 11:01 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 31/01/2024 **Time (वेळ):** 12:52 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 035

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 31/01/2024 19:15 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 4 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जिपप्राशिक्षण विभाग कार्या,परिसरातील श्री तायडे यांचे ,चहा कँन्टीन अमरावती

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** नरेश विठ्ठलराव तेटू

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1966

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नवाथेनगर, बडनेरा रोड,अमरावती,गाडगे नगर,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नवाथेनगर, बडनेरा रोड,अमरावती,गाडगे नगर,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9145491505

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संपदा संतोष ढगे | | | 1. अथर्व सोसायटी, 3 रा माळा, सिध्दीविनायक नगर, रहाटगाव,, अमरावती,गाडगे नगर,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

हकीकत -फिर्याद दि.31/01/2024.श्री.नरेश विठ्ठलराव तेटू , वय-58 वर्ष, व्यवसाय-सेवानिवृत्त शिक्षक, रा. नवाथेनगर, बडनेरा रोड, अमरावती, मो.9145491505. मी अन्टी करप्शन ब्युरो अमरावती येथे हजर राहुन माझी फिर्याद देतो की, मी वरीलप्रमाणे असुन वरनमुद पत्यावर सहपरिवार राहतो व शिक्षक या पदावरून सेवानिवृत्त असल्याने मला मिळणा-या पेन्शनवर माझा आणि माझ्या परिवाराचा उदरनिर्वाह चालवतो.मी जि.प.कनिष्ठ महाविद्यालय,ता.चांदुर रेल्वे, जि. अमरावती येथुन शिक्षक या पदावरून दि.31/01/2023 रोजी सेवानिवृत्त झालो असुन सध्या मला 51,741/-रू. एवढी मासिक पेन्शन मिळते. माझ्या 31 वर्षाच्या सेवेतुन जमा झालेला गट विमा योजना( जी.आय.एस) हा 1,90,846/-रू. एवढा जमा आहे. सदरची रक्कम ही सेवानिवृत्तीनंतर जवळपास 6महिण्याच्या आत मिळावयास पाहिजे परंतु ते अद्याप मला मिळाली नाही. माझ्या सेवानिवृत्तीनंतर लवकरच गटविम्याची केसही जि.प. कनिष्ठ महाविद्यालय, ता.चांदुर रेल्वे, जि. अमरावती तर्फे शिक्षणाधिकारी कार्यालय (प्राथमिक), जि.अमरावती येथे पाठविण्यात आली असल्याची माहिती मला महाविद्यालयाचे आस्थापणा शाखेकडून मिळाल्याने व गट विमा योजना(जी.आय.एस) प्रकरण शिक्षणाधिकारी कार्यालय जि. प. प्राथमीक शिक्षण विभाग, जि. अमरावती येथे अद्याप प्रलंबित असल्याचे समजले. मला आर्थिक अडचण असल्याने मी केसचा पाठपुरावा करून ती लवकर मंजूर करून घेणे साठी शिक्षणाधिकारी कार्यालय (प्राथमिक), जि.अमरावती येथे जायचे ठरवले.जि.प. माध्यमिक शाळा, ता.चांदुर रेल्वे, जि. अमरावती येथील एक सेवानिवृत्त शिक्षक व हे माहे जुन 2023 मध्ये सेवानिवृत्त झाले असल्यामुळे मी त्यांचे आधी सेवानिवृत्त झालो परंतू त्यांना माझे आधीच गटविमा रक्कम लवकर मंजूर होवून मिळाली आहे. मी त्यांना भेटुन विचारले की, "तुमचा गटविमा कसा काय लवकर मंजूर होवून मिळाला? माझा तर अजुन प्रलंबितच आहे." तेव्हा त्यांनी मला, "शिक्षणाधिकारी कार्यालय (प्राथमिक), जि.अमरावती येथील कनिष्ठ सहायक श्रीमती ढगे मॅडमला भेटा, तुमचे पण काम लवकर होईल" असे सांगितले वरून मी दि. 26/12/2023 रोजी दुपारी अंदाजे 2.50 वाजता शिक्षणाधिकारी कार्यालय जि. प. प्राथमीक शिक्षण विभाग, जि.अमरावती येथे जावून तेथील कनिष्ठ सहायक श्रीमती ढगे मॅडमला भेटून त्यांना माझा परीचय दिला व माझी गट विमाची रक्कम लवकर मंजूर होणे साठी गट विमा योजना (जी.आय.एस) प्रकरण मंजुरीसाठी पाठवण्याची विनंती केली असता त्यांनी मला खडसावून, "तसच काम कराव का आम्ही? असे म्हटले. "आमच काही घेण देण नाही का?" त्यांचे कडून मला माझे काम लवकर करून घेणे असल्याने नाईलाजाने मी त्यांना म्हटले की, "सांगा मग काय घेण देण असते तुमचे?" अस म्हणताच त्यांनी म्हटले की, "मला तुमच्या 1,90,846/- रू बिलाच्या 1 टक्के नुसार 1900 होतात तुम्ही मला राउंड फिगर 2000/- देवुन टाका तुमचे काम लवकर करून देते. "जा मग या उद्या... परवा" असे म्हणून 2000/-रूपये लाचेची मागणी केली असुन त्यांनी माझी गट विम्याची केस जाणुन बुजुन पुढील मंजुरी प्रक्रिये करीता न पाठविता त्यांचेकडेच स्वतःचे आर्थिक फायद्या करीता अडवुन ठेवली आहे. अशा आशयाची तक्रार दि. 04/01/2024 रोजी पोनि विजया पंधरे मॅडम यांचे कडे दिली. त्यावरून पोनि विजया पंधरे मॅडम यांनी शासकीय दुग्ध योजना, अमरावती येथुन पंच श्री. पवन दत्तात्रय जुवार, पद -दुग्ध संकलन पर्यवेक्षक व श्रीमती मनीषा सिताराम बर्डेला, पद - दुग्ध शाळा परिचारक असे दोन सरकारी पंच कारवाई करीता बोलविले.मला व पंचाना एकमेकांचा परिचय करून दिला. सदर दिलेल्या तक्रारीवर पंच क्र. 1 श्री. जुवार यांनी शेरा लिहुन दोन्ही पंचांनी तक्रारीवर सहया केल्या व समक्ष म्हणुन पोनि पंधरे मॅडम यांनी सुध्दा सही केली आहे. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पंधरे मॅडम यांनी सांगीतले की, मला लोकसेवक श्रीमती ढगे या खरच लाच रक्कम मागणी करीत आहे किंवा नाही याबाबत पडताळणी कार्यवाही करण्याचे सांगीतलेवरुन लागलीच माझेजवळ व्हाईस रेकॉर्डर चालू करुन पंच क्र.1 श्री.जुवार सह शिक्षणाधिकारी कार्यालय जि. प. प्राथमीक शिक्षण विभाग, जि.अमरावती येथे श्रीमती ढगे यांना भेटण्या करीता रवाना केले. त्याठिकाणी पोहचल्यानंतर लोकसेवक श्रीमती ढगे यांची भेट घेवुन माझे प्रलंबित गट विमा योजना(जी.आय.एस) बिला बाबत विचारले असता श्रीमती ढगे यांनी मला नंतर बघु असे सांगितले. त्यानंतर दि.08/01/2024 रोजी मी व पंच .1 श्री.जुवार सह शिक्षणाधिकारी कार्यालय जि. प. प्राथमिक

शिक्षण विभाग, जि.अमरावती येथे श्रीमती ढगे यांची भेट घेवुन माझे प्रलंबित गट विमा योजना (जी.आय.एस) बिला बाबत विचारून पैशा संबंधी विचारले असता त्यांनी मला तुमच्या मनाने देवुन देजा व आता तुम्ही येवु नका 30 तारखेनंतर या आता मला खुप काम आहे असे सांगितले. त्यावरुन आज दि. 31/01/2024 रोजी मी व पंच .1 श्री.जुवार सह शिक्षणाधिकारी कार्यालय जि. प. प्राथमिक शिक्षण विभाग, जि.अमरावती येथे श्रीमती ढगे यांची भेट घेवुन माझे प्रलंबित (जी.आय.एस) बिला बाबत विचारून पैशा संबंधी विचारले व त्यांना माझे प्रलंबित गट विमा योजना(जी.आय.एस) बिल 1,90,846/- रूपयाचे 1टक्के नुसार 2000/- रू देतो माझे काम लवकर करा असे बोलले असता श्रीमती ढगे यांनी मला हो ठीक आहे असे बोलुन माझेकडुन 2000/- रूपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारण्याचे मान्य केले त्यावरून लोकसेवक श्रीमती ढगे यांचे विरुध्द आज दि. 31/01/2024 रोजीच सापळा कार्यवाही आयोजित करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले त्यानंतर पंधरे मॅडम यांनी सापळा पुर्व कार्यवाही पंचनामा केला त्यामध्ये पोनि पंधरे मॅडम यांचे सुचनेवरून पोशि थोरात यांनी नोटाला अँन्थ्रासीन पावडर लावुन लाच रक्कम 2000/- रू (प्रत्येकी500/- रू दराच्या 04 नोटा) माझे हाफ बाहेच्या स्वेटरच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवुन दिली व पोशि जायले यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवून मला व पंच क्र.1 श्री.जुवार यांना श्रीमती ढगे मॅडम यांची भेट घेण्याकरीता शिक्षणाधिकारी कार्यालय जि. प. प्राथमीक शिक्षण विभाग, जि.अमरावती येथे रवाना केले ती वेळ सकाळी 11.01 वाजताची होती. आमच्या पाठोपाठ आपण सापळा पथकातील इतर कर्मचारी व अधिकारी हे खाजगी वाहनाने शिक्षणाधिकारी कार्यालय जि. प. प्राथमीक शिक्षण विभाग, जि.अमरावती येथे येवुन कार्यालयाच्या आजुबाजुला आडोसा घेवुन थांबले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 श्री. जुवार असे कार्यालयात गेलो असता, श्रीमती ढगे मॅडम यांच्या समोर गर्दी असल्याने मी कार्यालयाचे बाहेर येवुन श्रीमती ढगे मॅडमला फोन केला व पैसे घेवुन बाहेर आलो असल्याचे सांगितले त्यावर श्रीमती ढगे मॅडम यांनी मला मीच बाहेर येतो असे बोलल्या थोडयाच वेळात श्रीमती ढगे मॅडम व त्याच्या सोबत त्यांच्या सहकारी धारणे मॅडम बाहेर आल्या त्यानंतर कार्यालयाच्या जवळच असलेल्या चहाच्या कॅन्टीनवर मी व पंच क्र. 1 जुवार आणि श्रीमती ढगे मॅडम व श्रीमती धारणे मॅडम असे सर्व सोबत गेलो त्यावेळी श्रीमती ढगे मॅडम यांनी माझेकडुन 2000/- रूपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली व त्यांचे अंगातील स्वेटरच्या समोरील डाव्या खिश्यात ठेवलेली. त्यानंतर मी लागलीच लाच रक्कम स्विकारण्याचा नियोजित इशारा केला. त्यावेळी तात्काळ माझे जवळ पंधरे मॅडम, पंच क्र.2 श्रीमती मनीषा बर्देला तसेच सापळा पथकातील सर्व स्टाफ त्याठिकाणी आले व त्यांनी श्रीमती ढगे मॅडम यांना ताब्यात घेतले तेव्हा पोशि जायले यांनी माझ्या जवळील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केले ती वेळ सकाळी 11.30 वाजताची होती . पंधरे मॅडम यांनी श्रीमती ढगे मॅडम यांना त्यांचे नाव, पद, व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्रीमती संपदा संतोष ढगे, वय 40 वर्ष पद- कनिष्ठ सहायक, नेमणुक -शिक्षणाधिकारी कार्यालय जि. प. प्राथमीक शिक्षण विभाग, जि. अमरावती वर्ग - 3 रा.फ्लॅट क्र. 8, अथर्व सोसायटी, 3 रा माळा,सिध्दीविनायक नगर, रहाटगाव, अमरावती असे सांगितले. त्यावेळी श्रीमती ढगे यांनी माझ्या कडुन स्विकारलेली लाच रक्कम जी त्यांचे अंगातील स्वेटरच्या समोरील उजव्या खिश्यात ठेवलेली ती पंधरे मॅडम यांनी श्रीमती ढगे यांचेकडुन पंचासमक्ष जप्त केली. तसेच श्रीमती ढगे यांचेकडुन माझे प्रलंबित (जी.आय.एस) बिल त्यांच्याकडुन तपास कामी ताब्यात घेतले व पुढील कार्यवाही करीता लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय अमरावती येथे आलो. केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा केला. तरी माझे सेवानिवृत्तीनंतरचे प्रलंबित गट विमा योजनेचे 1,90,846/- रूपये बिलाच्या प्रस्तावाचे नोटशीट तयार करून मंजुरीसाठी वरिष्ठांकडे सादर करण्यासाठी श्रीमती संपदा ढगे, पद-कनिश्ठ सहायक, नेमणुक -शिक्षणाधिकारी कार्यालय जिल्हा परिषद, प्राथमीक शिक्षण विभाग, जि.अमरावती वर्ग - 3 यांनी दिनांक 31/01/2024 रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान 2,000/-रू लाचेची मागणी करून दिनांक 31/01/2024 रोजी 2,000/- रू लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांचे विरुध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.माझी वरिल प्रमाणे फिर्याद लॅपटॉपवर टाईप केली असुन त्याची प्रिंट काढून झालेवर ती मला वाचायला दिली, माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी टाईप केली आहे.अशा फि.च्या फिर्याद वरुन व डिओ सा याचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला.

(एन.सी.आ...
...न्वेषण फॉर्म -

पोलीस ... नगर
सत्यमेव जयते
अमरावती (शहर)



13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Reshma Ganesh Kadam
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): gajanan mahadevra
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):